पुणे महानगरपालिका
उद्यान विभाग
उद्यान स्वच्छता सप्ताह

# " प्रेसनोट "

भारतातील सर्व शहरांमधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे, यासाठी केंद्र शासनाने 'स्वच्छ भारत अभियान ' संपूर्ण देशामध्ये राबविलेले आहे.

संपूर्ण भारत हा स्वच्छ देश म्हणून ओळखला जावा, यासाठी केंद्र सरकारने राबविलेली योजना महत्वपूर्ण आहे. ही योजना यशस्वी होण्यासाठी नागरिकांचाही हातभार लागणे आवश्यक आहे.

पुणे महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत " स्वच्छ भारत अभियान २०२०" अंतर्गत ' उद्यान स्वच्छता सप्ताह ' दिनांक २४ जून ते २९ जून २०१९ रोजी साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये परिमंडळ क्रमांक १ ते ५ मधील एकूण ६० उद्यानांमध्ये हा स्वच्छता सप्ताह होणार आहे. या कार्यक्रमात उद्यान विभाग, आरोग्य विभाग , घनकचरा विभाग, स्थानिक नागरिक, हास्य क्लब, स्वयंसेवी संस्था, शाळा, कॉलेज तसेच लोकप्रतिनिधी सहभागी होणार आहेत. नागरिकांना स्वच्छतेबाबतची जाणीव होणे व कचऱ्याचे वर्गीकरण होणे याबद्दल माहिती देण्यात येणार आहे. पुणे महानगरपालिकेच्या विविध उद्यानांमध्ये ' उद्यान स्वच्छता सप्ताह ' साजरा करण्यात येणार असून याबाबतची सविस्तर माहिती पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. यात जास्तीत जास्त नागरिक, स्वयंसेवी संस्था, शाळा, कॉलेज यांनी सहभागी होवून स्वच्छ भारत अभियानास हातभार लावण्यात यावा, ही विनंती.

-- SD--
(अशोक दि.घोरपडे)
मुख्य उद्यान अधिक्षक
पुणे महानगरपालिका